पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/स्वयंअशाळा/१५०८ /१७
पुणे १ दिनांक :- ४/१०/२०१७

प्रति,

अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,
नवग्रह शिक्षण प्रसारक मंडळ, मु. पो. किवळे, ता. हवेली, जि. पुणे संचलित एंजल्स पब्लिक स्कूल, मु. पो. किवळे, ता. हवेली, जि. पुणे

विषय:- सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

संदर्भ:- १) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र १,६,२४) २०१२
२)शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१, दिनांक २० जून २०१२
३)शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. एसएफएस-२०१७/प्र.क्र.१४४/एसएम-२,दि.२६/५/२०१७
४) मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र क्र. शिउसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता /पुवि/२०१६/ ५६६३, दि. १६/८/२०१७

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. १ च्या पत्रानुसार नविन शाळा स्थापन करणेकरिता खालील अटी व शर्तीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ९ |
| १ | नवग्रह शिक्षण प्रसारक मंडळ, मु. पो. किवळे, ता. हवेली, जि. पुणे | एंजल्स पब्लिक स्कूल, मु. पो. किवळे, ता. हवेली, जि. पुणे | इंग्रजी | नवीन शाळा (राज्यमंडळ) | प्राथमिक ते उच्च प्राथमिक | स्वयंअर्थ सहाय्यित सन २०१६-१७ |

अटी व शर्ती

.१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
.२. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
.३. या अधिनियमातील तरतुदीनूसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
.४. संदर्भ क्रमांक ०२ अन्वये सन २०१६-१७ मध्ये परवानगी देण्यात येत आहे.
.५. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
.६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
.७. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
.८ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
.९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर-
.१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
.२. मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.
.३. मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.
.४. प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड, म.न.पा. पिंपरी, पुणे

Scanned with OKEN Scanner

# पुणे जिल्हा परिषद , पुणे

शिक्षण विभाग (प्राथमिक)

यशवंतराव चव्हाण भवन, १ वेलस्ली रोड कॅम्प, पुणे ४११ ००१

ई मेल edupri.punezp@gmail.com वेबसाईट https: / /punezp.mkcl.org


जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा१/ ८८९/ /२०२४ दिनांक /१०/२०२४

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,
एंजल्स पब्लिक स्कुल, किवळे,
ता. हवेली, जि. पुणे

विषय:- एंजल्स पब्लिक स्कुल, किवळे, ता. हवेली, जि. पुणे या शाळेला राज्य मंडळ ऐवजी सी.बी.एस.ई. शुध्दीपत्रक करुन मिळणेबाबत.

संदर्भ:- १. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.एसएफएस-१०१७/प्र.क्र.१४४/एसएम-२, दिनांक २६/०५/२०१७

२. मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे यांचेकडील जा.क्र.शिउसं/माध्य-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१६/५६६१, दिनांक १६/०८/२०१७

३. या कार्यालयाकडील जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/स्वयंअशाळा/१५०८/१७, दिनांक ०४/१०/२०१७

४. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र.एसएफएस-१०१७/प्र.क्र.११७/एसएम-२, दिनांक १८/०२/२०२०

५. मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे यांचेकडील जा.क्र.शिउसं/प्राथ-२०२/२०२०-२०२१/४०९५, दिनांक २४/०९/२०२०

६. आपलेकडील जा.क्र.७०/२०२४-२५, दिनांक ०९/०९/२०२४.

शुध्दीपत्र:-

या कार्यालयाचे संदर्भिय क्रमांक ०३ पहावे, त्यामधील रकाना क्र. ५ मध्ये शाळेच्या मंडळ संलग्नतेमध्ये राज्य मंडळ ऐवजी सी.बी.एस.ई. अशी दुरुस्ती संदर्भिय शासन शुध्दीपत्रक क्र. ४ व मा. शिक्षण उपसंचापलक, पुणे विभाग पुणे यांचेकडील संदर्भ क्र. ५अन्वये केलेली आहे. त्यामुळे या दुरुस्तीनुसार वाचावे.

सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षाकरिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नविन शाळा/दर्जावाढ करण्यास परवानगी देण्याबाबतच्या संदर्भाधीन क्र. ३ च्या या कार्यालयाचे दिनांक ०४/१०/२०१७ च्या पत्रातील सर्व अटी व शर्ती जशाच्या तशा सदर शाळेस लागू राहतील.

(संजय नाईकडे)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे